जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८९ दिनांक - २२/०३/२०२५**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर

**गांजा विक्रेत्यावर कारवाई, १९०००/- रुपये किं.चा. गांजा जप्त**

दि.२१/०३/२०२५ रोजी पुणे सोलापुर रोडचे कडेला,माळीमळा येथील राजेंद्र भोजनालयाचे समोरील बाजुस असलेल्या, चिंतामणी मार्बल्स चे पाठीमागे, मोकळया जागेमध्ये ३ इमस गांजा विकत आहेत वगैरे मजकुरची खबर लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील पोलीसांना प्राप्त झाली. प्राप्त खबरी प्रमाणे पोलीसांनी त्याठिक्राणी छापा कारवाई केली असता त्या ठिकाणी **१) शुभम बापु पालखे वय २१ रा. दत्तमंदिर जवळ, जुनाॅकनल शेजारी, हडपसर, पुणे २) मयुर विलास बोरकर वय २५ रा. वेताळबाबा वसाहत, ग्लायडींग सेंटर जवळ, हडपसर, पुणे ३) अमन महंमद रफिक कोतवाल वय २७ रा. विठ्ठल मंदिराजवळ, माळवाडी, हडपसर, पुणे** असे तीन इसम गांजा विक्री करताना मिळुन आले. त्यांचेकडुन लोणी काळभोर पोलीसांनी एकुण ९३० ग्रॅम वजनाचा एकुण १९०००/- रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे.

सदरची कागगिरी मा.पोलीसउप आयुक्त, परिमंडळ ०५, डॉ.राजकुमार शिंदे, मा. सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, श्रीमती अनुराधा उदमले यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र पन्हाळे, पोलीस उप निरीक्षक सर्जेराव बोबडे, पोलीस अंमलदार क्षिरसागर, ढमढेरे, कटके, नानापुरे यांनी केली आहे.